**विषय : गट स्तरावरील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या (पर्यवेक्षकीय) कर्मचाऱ्यांसह मुख्यालयातील अनावश्यक फिरती बाबत...**

## नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

जावक क्रमांक : मुकाअ/वै.का/ १६३ /२०१७.

नाशिक, दिनांक : ०५ /०७/२०१७.

## -: परिपत्रक :-

गट स्तरावरील वर्ग-३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचाऱ्यांसह, शिक्षकांसह) व वर्ग-४ चे कर्मचारी मुख्यालयांत कोणत्याही प्रकारचे शासकीय कामकाज नसतांना फिरतांना निदर्शनास येते व मुख्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामकाजामध्ये अडथळा निर्माण करण्यांचा प्रयत्न करतात. परंतू मुख्यालयात येतांना सदरचे कर्मचारी गट स्तरावरील फिरती नोंदवहीमध्ये शासकीय कामकाजासाठी मुख्यालयांत जात असल्याचे नोंद दर्शवितात, त्यानंतर सदरचे कर्मचारी हे प्रवासभत्ते बिले मिळणेसाठी दावा करतात. परिणामी यामध्ये शासनास विनाकारण आर्थिक नुकसान सोसावे लागते, व शासकीय वेळेचा देखील यामध्ये अपव्यय होतो.

तसेच गट स्तरावरील वर्ग-३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचारी, शिक्षक देखील) मुख्यालयांत शासकीय कामकाजासाठी मोठया प्रमाणांत येत असल्याचे निदर्शनास येते, परंतू त्यांचेकडील कामकाजाची कोणत्याही प्रकारची पर्यायी व्यवस्था न करता सदरचे कर्मचारी मुख्यालयांत फिरतीवर येतात. (उदा. ०१) एक शिक्षकी शाळेवरील संबंधित उपशिक्षक शासकीय कामकाजासाठी मुख्यालयांत आल्यास, तेथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते) पर्यवेक्षकीय कामकाज करणारे कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, विस्तार अधिकारी (ग्रा.पं./उद्योग)(आरोग्य), कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक इ. संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या फिरतीमुळे स्थानिक नागरिकांना कामकाजासंबंधात अडचणी निर्माण होतात, परिणामी स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी यांच्या रोषाला सामोरे जावे लागते.

त्यानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांनी कोणत्याही वर्ग-३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचाऱ्यांसह, शिक्षकांसह) व वर्ग-४ चे कर्मचारी यांना शुल्लक कारणासाठी मुख्यालयांत पाठवु नये, अत्यंत महत्वाचे कामकाज असल्यास, सदरच्या कर्मचाऱ्यांस गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांनी त्यांचे परवानगीसह पाठविणेत यावे. अत्यंत महत्वाच्या कामासाठी मुख्यालयांत आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांनी त्यांचे कार्यालयांत नोंदवही ठेवावी व सदरच्या नोंदवहीमध्ये नियमितपणे अद्यावत नोंदी घ्याव्यांत. (गट स्तरावरील फिरतीवर आलेले कर्मचाऱ्यांकडून सदरची नोंद त्यांचे स्वाक्षरीसह नोंदवून घ्यावी.)

सदरच्या परिपत्रकान्वये उपरोक्त सूचना देऊन देखील वर्ग-३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचाऱ्यांसह) व वर्ग-४ चे कर्मचारी यांना शुल्लक कारणासाठी मुख्यालयांत फिरतीवर असल्याचे निदर्शनास आल्यास, सदरच्या कर्मचाऱ्यांविरुध्द सदरच्या परिपत्रकाचे अवमान केले म्हणुन एकतर्फी शिस्त विषयक कार्यवाही करण्यांत येईल, याव्दारे नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यांत येऊन, स्थायी आदेश संचिकेमध्ये सामील करण्यांत यावा.

CHIEF EXECUTIVE OFFICER ZILLA PARISHAD, NASHIK

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

**प्रति,**

०१. खातेप्रमुख, जिल्हा परिषद, नाशिक (सर्व) ----------------
०२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ..................
०३. सहा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ..................
०४. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) ..................
०५. उप अभियंता (इवद)/(लपा), जि.प.उपविभाग (सर्व) ..................
०६. बालविकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.कार्यालय (सर्व) ..................
०७. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, (सर्व) ..................
०८. तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ..................
०९. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र/पथक (सर्व) ..................
१०. वैद्यकीय अधिकारी, आयुर्वेदिक दवाखाने (सर्व) ..................

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर.**

०१. मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
०२. मा.सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
०३. मा.अध्यक्षा/उपाध्यक्ष, सभापती, विषया समित्या (सर्व), जिल्हा परिषद, नाशिक.
०४. मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.

प्रत : अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.